# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक २९.११.२००५ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.१६) इतिवृत्त**

मंगळवार दिनांक २९ नोव्हेंबर २००५ रोजी स्थायी समितीची सभा मा.सभापती श्री.काशिनाथ कोकाटे यांचे अध्यक्षतेखाली ''मलिक अंबर स्थायी समिती सभागृह '' येथे सकाळी १२.३० वाजता ''वंदे मातरम्'' या गिताने सुरू झाली. या सभेस मा.आयुक्त व अधिकारी वर्गासह खालील सन्माननीय सभासद उपस्थित होते.

(०१) श्री. कावडे साहेबराव राणुबा
(०२) सौ. खंदारे वंदना प्रकाश
(०३) श्री. गवळी रविकान्त काशीनाथ
(०४) सौ. जधाव संगिता विठ्ठलराव
(०५) सौ. दलाल लता श्रीनिवास
(०६) श्री. दाभाडे मिलींद यशवंत
(०७) श्री. दिलीप नारायण गायकवाड
(०८) श्री. पांडे विनायक प्रभाकर
(०९) श्री. नासेर नहदी महंमद याहिया नहदी
(१०) श्री. मुजीब आलमशाह खान
(११) श्री. बारवाल गजनन रामकिशन
(१२) श्री. बैनाडे कंवरसिंग किसनसिंग
(१३) श्री. विसपुते शशांक दामोधर
(१४) श्री. वैद्य रेणूकादास दत्तोपंत

<u>**संवाद :**</u>

सौ.लता दलाल :शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या दोन्ही जलवाहिन्या सातत्याने आठ दिवसाला एकदा फुटतात व अशी परीस्थिती असेल तर संमातर जलवाहिनी टाकण्याचा प्रस्ताव प्रशासन का सादर करीत नाही. गेल्या सहा महिण्यात अनेकदा जलवाहिनी फुटलेली असून दुरूस्तीचे काम निष्कृष्ट दर्जचे होते असे माझे मत आहे. गेल्या मे महिण्यापासून किती वेळेस जलवाहिनी फुटली व दुरूस्तीच्या कामावर किती खर्च झालेला आहे याची माहिती देण्यात यावी. शहरात अनेक भागात एकाच वार्डात अर्ध्या भागात पाणी येते तर अर्ध्या भागात पाणी येत नाही अशी परीस्थिती आहे. समांतर जलवाहिनी टाकण्याविषयी प्रशासनाने काय कार्यवाही आतापर्यत केलेली आहे याची माहिती देण्यात यावी.

श्री.विनायक पांडे : गेल्या दहा दिवसात पहाडसींगपूरा तसेच बेगमपूरा भागात पाणीच आलेले नाही. नागरीकांना याचा त्रास झालेला आहे. मी स्वत: पाणी मिळण्यासाठी एन-५ येथील पाण्याच्या टाकीवर प्रयत्नात होतो. सतत जलवाहिनी फुटल्यामूळे शहराला पाणी नाही.समातंर जलवाहिनी टाकण्याची आवश्यकता आहे. त्या संबधी प्रशासनाने काय कार्यवाही केलेली आहे. जर एखादया जलवाहिनीचे आयुष्य संपलेले असेल तर दुरूस्तीच्या कामावर किती वेळा व किती खर्च करणार आहे.

श्री.शंशाक विसपूते : नेहमी पाईपलाईन का फुटते याची सखोल चौकशी करण्यात यावी. कोणत्याही कंपनीमधे १५० ते २०० डिग्री पर्यत ट्रेप्रेचर असून १० ते १२ केजी पर्यंत प्रेशर असतांना पाईप लाईन फुटत नाही. महानगरपालिकेची पाईपलाईन कशी फुटते याची चौकशी झाली पाहिजे दुरूस्तीचे काम कुमकूवत होते. अशी वेळ आल्यानंतर पर्यायी काय व्यवस्था असते याचाही विचार करावा. पाणी नाही म्हणून संपूर्ण नागरीक त्रस्त आहेत. याचा गाभींर्याने विचार करण्यात यावा.

श्री.कवरसिंग बैनाडे :पाणी नसल्यास सर्वांनाच त्रास होतो यात शंका नाही. १९९५ पासून मी बघतो आहे, प्रशासन लाखो रूपयांचे भुखंडाचे किंवा इतर प्रस्ताव तातडीने मंजूरीसाठी सादर करते परंतु पिण्याच्या पाण्यासाठी का उपाययोजना केली जत नाही. का त्यासंबधीचा प्रस्ताव मंजूरीसाठी येत नाही. गेल्या दहा वर्षापासून नागरीकांना पिण्याच्या पाण्याचा त्रास आहे. नागरीकांना पाणी पुरवठा करू शकत नाही तर इतर सुविधा देता येतील का असा प्रश्न पडतो. लाईटच्या बाबतीतही बजेट नाही म्हणून स.सदस्यांना सांगण्यात येते. नेहमीच जलवाहिनी का फुटते,देखभाल दुरूस्तीचे काम निष्कृष्ट दर्जचे होते का. नेहमीच दुरूस्तीच्या कामावर खर्च केला जतो. शहरातील नागरीकांना एक दिवसा आड पाणी देण्यात येते पूर्ण वर्षाची पाणी पट्टी घेण्यात येते. सहा महिण्याचीच पाणीपट्टी का घेण्यात येत नाही. नागरीकांना पाणी टंचाई निर्माण होवू नये याची दखल घेण्यात यावी.

श्री.दिलीप गायकवाड : पाणी पुरवठा विभागाचे अधिकारी यांना सर्व सुविधा देवूनही शहरातील नागरीकांना पाणी पिण्यास मिळत नसेल तर अधिकाऱ्याच्या सुविधा बंद कराव्यात अशी विनंती आहे.

सौ.संगिता जधव : पुंडलिकनगर भागात गल्ली नं. १ ते ११ पर्यत पाणी देणार होते. ४ ते ५ महिण्यापासून प्रश्न उपस्थित करीत आहे, कार्यवाही होत नाही. गुंठेवारीच्या सर्वेचे काम सुरू केले, कोठे सर्वेचे काम होत आहे कळायला मार्ग नाही. सर्व खुलासा करण्यात यावा. योग्य खुलासा होत नाही तोपर्यत आम्ही आपल्या डासयसमोर हौद्यात बसून धरणे धरतो.

सौ. वंदना खंदारे : माझ्या वार्डात गादीया विहार येथे पिण्याचे पाणी येत नाही. तसेच काही ठिकाणी पिण्याच्या पाण्यात ड्रेनेजचे पाणी जते. नवीन पाईपलाईन टाकण्यात यावी स.सदस्य सौ. जधव यांनी जेधरणे धरले त्यात मीही सहभागी आहे.

(याच वेळी स.सदस्या सौ. जधव तसेच स.सदस्या सौ. खंदारे हया मा.सभापती यांचे डायस समोर धरणे धरतात.)

मा.सभापती : योग्य तो खुलासा केला जईल स.सदस्यांना विनंती की त्यांनी आपआपल्या जगेवर बसावे.

श्री.रविकांत गवळी : स.सदस्यांना धरणे धरावे लागते. गेल्या ८ दिवसापासून वार्डात पाणी नाही अत्यंत दुर्दवी बाब आहे. याची गंभीर दखल प्रशासन का घेत नाही. पाणी प्रश्नावर ठोस निर्णय घ्यावा, त्यानंतर इतर विषयावर चर्चा करण्यात यावी.

श्री.मुजेब खान : गेल्या पाच ते सहा महिण्यापासून प्रत्येक स.सदस्य आपआपले प्रश्न नियमित मांडतात. प्रत्येक वेळी असे सांगितले जते की पूढील बैठकीत खुलासा देण्यात येईल. परंतु वार्डातील नागरीकांना देण्यासाठी आता नगरसेवकांकडे उत्तर नाही. अधिकारी काम करीत नाही म्हणून स.सदस्य हे मोठमोठयाने बोलतात,

कामाची मागणी करतात. सर्वसाधारण सभेत स्थायी समितीमध्ये प्रस्ताव मंजूर होतात परंतू कोणत्याही कामास सुरूवात केलेली नाही. नगरसेवकांना एवढा त्रास सहन करावा लागतो तर आम नागरीकांना किती त्रास असेल याचा विचार करण्याची वेळ आलेली आहे. यासंबधी ठोस निर्णय होण्याची आवश्यकता आहे. विकास कामे का होत नाही प्रशासनाकडून खुलासा घ्यावा. यानंतर उडवाउडवीची उत्तरे ऐकून घेतली जणार नाही. स.सदस्याची कामे होत नाही म्हणून अधिकाऱ्याना मोठयाने बोलल्यानंतर प्रशासन पोलीस स्टेशनमधे गुन्हा नोंदण्याचे सांगतात हे बरोबर नाही. आम्ही जनतेच्या कामासाठी निवडून आलेलो आहोत. काम होत नसेल व स.सदस्यांचा मान राखला जत नसेल तर यापूढे सभेचे कामकाजहोवू देणार नाही. विकास कामे होण्यासंबधी प्रशासनास सुचित करावे.

श्री.रेणूकादास वैद्य : संपूर्ण शहरातील नागरीकांना पिण्याचे पाणी मिळालेच पाहिजे ही भावना सभागृहाची आहे. ऐन सणाच्या दिवशीच जलवाहिनी फुटते. नागरीक आम्हाला विचारतात. आम्ही अधिकाऱ्याकडून माहिती घेतो. अनेकदा असे सांगितले जते की दुरूस्तीचे काम झालेले आहे. पून्हा दुसऱ्या दिवशी वृत्तपत्रात येते की जलवाहिनी फुटली नक्षत्रवाडी ते रेल्वेस्टेशन या ठराविक भागातच ही जलवाहिनी का फुटते कळायला मार्ग नाही. याचा सविस्तर खुलासा करावा.

सौ. संगिता जधव : जेपर्यत योग्य खुलासा होत नाही तोपर्यत आम्ही येथून उठणार नाही.

श्री.गजनन बारवाल : स.सदस्यांना आपल्या समोर हौदात बसून धरणे करण्याची वेळ आलेली आहे. ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे. यापूर्वीही जे जे खुलासा मागविलेला आहे तो मिळालेला नाही. पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झालेला आहे. गेल्या दहा दिवसापासून या संदर्भात बातम्या येत आहेत. असे असतांनाही सुध्दा कार्यवाही होत नाही प्रशासन कुठेतरी कमी पडते आहे हे नाकारता येणार नाही. पाणी प्रश्न कसा सोडविता येईल या बाबतीत निर्णय घेण्यात यावा त्यासाठी किती बजेट अपेक्षित आहे. ते कोठून घेता येईल. त्या बाबतीत नियोजन काय आहे. हा संपूर्ण खुलासा करण्यात यावा.

सौ.लता दलाल : आजचा दिवस व यापूर्वीही मला प्रश्न सोडवून घेण्यासाठी हौद्यात बसावे लागले होते. हे दोन्हीही दिवस आम्ही स्थायी समितीच्या कार्यकाळाचे काळे दिवस समजतो. प्रत्येक वेळी स.सदस्यांना हौद्यात बसावे लागत असेल तर ते सहन केले जणार नाही. लोकांसोबत रस्त्यावर उतरू व प्रशासनास काम करण्यास भाग पाडू याची नोंद घ्यावी. स.सदस्यांच्या प्रश्नाकडे अधिकारी,कर्मचारी दुर्लक्ष करतात. अधिकारी कर्मचारी यांचे फायदे व सवलती देण्याचे प्रस्ताव तात्काळ मंजूरीसाठी समोर येतात परंतू नागरीकांसाठीचे प्रस्ताव समोर येत नाही. गेल्या मे महिण्यापासून ही जलवाहिनी सातत्याने फुटते आहे अशी परीस्थिती असतांना समांतर जलवाहिनीचा प्रस्ताव मंजूरीसाठी का प्रशासनाने दिलेला नाही. जनतेसाठीचे जे प्रश्न आहे ते सोडविण्याचे अगोदर प्रयत्न झाले पाहिजे मग ते कोणतेही काम असेल. पून्हा पून्हा त्याच त्या ठिकाणी दुरूस्तीचे काम करावे लागत असेल तर अशा ठेकेदाराचे बिल सुध्दा थांबविण्यात यावे. होणारे काम हे निष्कृष्ट दर्जचे होत आहे हे स्पष्ट होते. जेआम्ही प्रश्न उपस्थित करतो ते काम होत नाही. अतिक्रमणाच्या ठिकाणी स.सदस्यांची नावे दाखवली जतात.

नगरसेवकांनी बोलल्यानंतरच काम करायचे का, प्रत्येक वेळी वेगवेगळया विषयावर सातत्याने बोलावे लागते. समांतर जलवाहिनीचा प्रस्ताव प्रशासनाने आजच्या बैठकीत मांडवा अशी विनंती करते तसे आदेश आपण करावेत. यापूढे पाण्याचा प्रश्न निर्माण झाला तर प्रत्येक नगरसेवक हे वार्डातील जनतेला सोबत घेवून मोर्चे काढतील. त्यावेळी प्रशासनाची बाजू आम्ही घेणार नाही याची नोंद घ्यावी.

श्री.नासेर नहदी :स.सदस्यांनी केलेल्या सुचनांची अमलबजवणी होत नाही. वारंवार डायस समोर बसून धरणे धरावे लागते. लाईट,पाणी व इतर विकास कामासाठी स.सदस्य वारंवार प्रश्न उपस्थित करूनही प्रशासन कार्यवाही करीत नाही. या मागचे प्रशासनाचे धोरण काय आहे खुलासा घेण्यात यावा. आताच स.सदस्य श्री. वैद्य यांनी म्हटल्या प्रमाणे एका ठराविक भागात ही जलवाहिनी का फुटते याचे कारण काय याचाही खुलासा घेण्यात यावा. वार्डात चार दिवसापासून पाणी नाही याकडे दुर्लक्ष होते आहे. ज्या भागात लोकांनी बेटरमेंट चार्जेस भरलेले आहे. त्यांना टँकर द्वारे पाणी दिले जत होते परंतू आता चार दिवसापासून पाणी नाही. नागरीकांना पिण्याचे पाणी मिळत नाही. ते देण्याची तात्काळ कार्यवाही करावी.

मा.सभापती :पाणी प्रश्नाच्या बाबतीत सर्वांनी प्रश्न मांडलेले असूने सर्वांनी त्या बाबतीत समर्थन केलेले आहे. स.सदस्यांना विनंती करण्यात येते की त्यांचे प्रश्नाचा खुलासा घेतला जईल. त्यांनी आपआपल्या जगेवर बसावे. आपले समाधान झाले नाही तर योग्य तो निर्णय घेण्यात येईल. पाण्याची मोठी टंचाई शहरात जणवत आहे. महत्वाच्या विषयावर स.सदस्यांनी चर्चा केली आहे. कार्य.अभियंता पाणीपुरवठा यांनी खुलासा करावा.

(याच वेळी स.सदस्या सौ. खंदारे तसेचसौ. जधव आपआपल्या जगेवर जवून बसतात.)

कार्य. अभियंता(पापू) : औरंगाबाद शहराला ७००, १२०० **मी.मी.च्या** पाईपलाईनने पाणीपूरवठा होतो. रेल्वेपूलाखाली तीन वर्षापूर्वी दोन ठिकाणी जी पॅरलल स्वतंत्र लाईन केलेली आहे तेथे जॅईन्ट करायचे होते. म्हणून २२ तारखेपासून दोन दिवसाचा खंडनकाळ घेतलेला होता.

सौ. लता दलाल :मे महिण्यापासून ही जलवाहिनी किती वेळेस फुटलेली आहे व त्याची कारणे आणि यावर आतापर्यत किती खर्च झालेला आहे.

कार्य.अभियंता (पापू) : नक्षत्रवाडी ते रेल्वेस्टेशन याभागातच साधारणत: सात वेळेस वेळेस जलवाहिनी फुटलेली आहे. त्या जलवाहिनीचे आयुष्य अजूनही १५ वर्षाचे आहे.दुरूस्तीसाठी मे महिन्यापासून ४ ते ४.५० लक्ष रूपये खर्च झालेला आहे. ज्या ठिकाणी जॅईन्ट केले त्यांनंतर पाणी पुरवठा सुरळीत होणार होता परतू त्या बाजूलाच पुन्हा जलवाहिनी फुटल्यामुळे पुन्हा पूर्ण काम करावे लागले. दुसरी जलवाहिनी जी ७०० **एमएम** ची ती रात्री ३.०० वाजता इटखेडा येथे फुटलेली होती तो पाणी पुरवठा बंद करून त्याची सुध्दा दुरूस्ती करावी लागली. एक्स्प्रेस लाईन जी एन-५ च्या टाकीपर्यत जते. त्या टाकीमधून पाणीपुरवठा हा खंडन काळामधे इतर टाक्यामधे घेवून पाणी पुरवठा केलेला आहे. ७०० एमएमची पाईललाईन दुरूस्त करण्यास ३६ तास लागले. त्यानंतर तो सुरळीत चालू आहे. १४०० एमएम च्या जलवाहिनीवर जे जॅईन्ट करण्याचे काम केले त्याचे बाजूलाच पुन्हा

नवीन ठिकाणी जलवाहिनी फुटल्यामूळे खंडनकाळ वाढला. ७०० एमएमची जलवाहीनी ही १९७२ मधे टाकलेली असून तीचे आयुष्य हे ३० वर्षाचे असून ते संपलेले आहे. १९८५ मधे या जलवाहिनीला **बुस्टर** लावून इतर काम केले त्यामूळे ५० एमएलडी पाणी पूरवठा करण्याची कॅपॅसिटी करण्यात आलेली आहे. १४०० एमएम ची जलवाहिनी ही १९९२ मधे टाकण्यात आलेली आहे. त्यातून पाणी पूरवठा चालू आहे. ७०० एमएम ची जलवाहिनी व १४०० एमएमची जलवाहिनी ही अपुरी पडू लागल्यामूळे सन ९७-९८ मधे एक ६७ कोटीची योजना मंजूर केली त्यास शासनाची मान्यता पण मिळालेली होती. कामही सुरू करण्यात आले. ही योजना सन २००१ पर्यत पूर्ण होईल या अपेक्षेने काम सुरू करण्यात आले होते. त्यातून ६५ एमएलडी पाणी जस्तीचे शहराला मिळाणार होते. ती योजना २००१ पर्यत पूर्ण न झाल्यामुळे शहराला पाहीजेतसा पाणी पुरवठा होत नाही. ६५ एमएलडी पाण्याची आवश्यकता ही २००१ सालीच होती आता २००५ ला लोकसंख्या निश्चितच जस्त झालेली आहे. ही योजना अंमलात आणू शकत नाही हे लक्षात आल्यानंतर वेगवेगळया प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टंटकडून व बीओटी पध्दतीने बुट बेसीसवर जयकवाडीहून पाईपलाईन टाकणेसाठी कार्यवाही करायची म्हणून प्रस्ताव ठेवण्यात आला होता त्यास मान्यता मिळालेली आहे. त्यानंतर वेगवेगळे प्रोजेक्ट मॅनेजमेन्ट कन्सल्टन्ट नेमण्यासाठी निविदा काढण्यात आल्या बुट बेसिकवर पहिल्यांदा ही योजना करायची असे धोरण आहे. अगोदर त्याचे फिजेकली हे सर्व चेक होईल. उद्या त्या बाबतीत खुली चर्चा होणार असून निर्णय होईल. बीओटी पध्दतीने बुट बेसीसवर होत नसल्यास प्रोजेक्ट मॅनेजमेंन्ट कन्स्ल्टन्ट नेमून कार्यवाही होईल. त्याप्रमाणे समांतर पाईपलाईन होईल.

सौ.लता दलाल :एक्स्प्रेस लाईन म्हणून स्वतंत्र लाईन की एकाच लाईन मधून दोन भाग केलेले आहे याचा खुलासा करावा. नेहमी असे सांगण्यात येते की, या लाईनचे स्वतंत्र असे कोणतेही कामकाज नाही. फारोळयाला किंवा पंपीग मध्ये काही दुरूस्ती करायची असेल तर या पाईपलाईन मधून पाणी पूरवठा होत नाही. एक्सप्रेस लाईनअसतांना १४०० एमएमची पाईप लाईन चालू असतांना शहराला सुरळीत पाणी पुरवठा का होवू शकत नाही.

श्री.रेणूकादास वैद्य : एका ठराविक भागातच ती जलवाहिनी का फुटते याचा खुलासा करावा. टेक्नीकल कर्मचारी असतांना ही परिस्थिती का निर्माण होते हे कळायला मार्ग नाही अशावेळी काय उपाययोजना करणार आहे. संपूर्ण खुलासा झाला पाहिजे

श्री.मुजीब खान : जेव्हाही प्रश्न उपस्थित केला तेव्हा माहिती नाही असे उत्तर अधिकारी देतात. जिन्सी टाकीपासून नेहरूनगरपर्यत१० वर्षापूर्वी १.१० कोटी खर्च करून एक जलवाहिनी टाकण्यात आलेली होती. पाणी सोडण्यात आले परंतू नेहरूनगरच्या टाकीमधे पाणी वर जत नाही. ती जलवाहिनी टाकून उपयोग झालेला नाही. यात तांत्रिक अडचण आहे की टाकीमधे पाणी कमी आहे. याचा खुलासा करावा. एवढी रक्कम खर्च करूनही पाणी मिळत नाही. दोन वेळेस टेस्टींग घेतलेली आहे.

श्री.गजनन बारवाल : आताच खुलासा केलेला आहे. परंतू शहराला पाणी पूरवठा होत नाही मोठया टंचाईला सामोरे जवे लागते ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही. हे सर्व माहित

असतांना प्रशासनाने काही उपाययोजना केलेली आहे का व या सभागृहाला तशी माहिती दिलेली आहे का? आताच स.सदस्य श्री. मुजेब खान यांनी म्हटले की १.१० कोटी खर्च करूनही टाकीमधे पाणी जत नाही. हे काम करीत असतांना नियोजन कशा प्रकारचे होते एका भागापुरतेच असे प्रश्न मर्यादित नसून इतरही भागात हीच परीस्थिती आहे. जनतेला योग्य प्रकारे पाणी पुरवठा होत नाही असा माझा आरोप आहे. सिडको आणि शहर या भागात पाणी पुरवठा करण्यामध्ये मोठा फरक आहे. ज्या पाण्याच्या टाक्या आहेत त्या भरल्या जत नाही डायरेक्ट पाणी बायपास रेल्वेस्टेशनकडून येणारे पाणी हे वेदांतनगरला दिले जत नाही. पाण्याचे बाबत नियोजन केलेले असेल व एखादी एजन्सी नियुक्त केलेली असेल त्या एजन्सीने रिपोर्ट दिला असेल तो या सभागृहासमोर का आलेला नाही. आलेला असेल तर त्याची माहिती सभागृहास देण्यात यावी.

श्री.शंशाक विसपूते : एका ठराविक भागातच जलवाहिनी का फुटते याचा खुलासा अधिकाऱ्यांना देता आलेला नाही. परंतु यामागे काहीतरी कारण असू शकेल. एक वर्षापासून एक जलवाहिनीचे गारखेडा भागात काम चालू आहे. एकाच जलवाहिनीतून तीन कॉलनीमधे पाण्याची विभागाणी केलेली आहे. त्यास श्रध्दा कॉलनी , तिरूपती विहार, या भागात आपण पण भेट दिलेली आहे. एक जलवाहिनी ज्या भागातून जते कोठेही तोट्या नाहीत पूढील वस्तीस पाणीपुरवठा करतांना तीन ठिकाणी वॉल टाकण्यात आलेले आहे. सदर वस्तीस पाणी द्यावयाचे असल्यास साडेतीन तास जलवाहिनी चालू ठेवावी लागते व एका भागात एवढा वेळ सतत पाणी चालू राहाते सर्व रस्त्यावर पाणी येते. अधिकारी यांनी पाहणीही केलेली आहे पर्याय काढण्यात आला. त्यात पॅरलल लाईन टाकून त्यास बायपास करून पुढील वस्तीस जस्तीत जस्त पाणीपुरवठा होईल. एक वर्षापासून काम सुरू असून ज्या दिवशी ट्रायल होते त्याच दिवशी पाईपलाईन फुटते. एवढी गंभीर बाब असतांना ही पाईललाईन नेहमी का फुटते या संदर्भात संबधीतावर कोणतीही कार्यवाही आजपर्यंत करण्यात आलेली नाही. हजरो लिटर पाणी वाया जत आहे. गेल्या महिण्यात तीन वेळा ट्रायल घेण्यात आलेली आहे अधिकारी याची दखल घेत नाही.

श्री. कवरसिंग बैनाडे : एन-८ भागात पाण्याची टाकी करण्यास मंजूरी मिळालेली होती. आतापर्यंत कार्यवाही का करण्यात आलेली नाही खुलासा घेण्यात यावा.

मा.सभापती : आताच स.सदस्य श्री. मुजेब खान यांनी नेहरूनगरच्या टाकीसंबधी प्रश्न उपस्थित केलेला आहे. १.१० कोटी रूपये खर्च करूनही गेल्या १० वर्षापासून त्या जलवाहिनीतून पाणी पूरवठा होवू शकला नाही. ही बाब गंभीर असून यात कुणाची चुक आहे. पाण्याचा प्रश्न अत्यंत गंभीर आहे. त्याची दखल प्रशासनाने घ्यावी. ५ ते १० वर्षापासून जलवाहिनी टाकलेल्या असतांना चालू नाही. स.सदस्य अधिकाऱ्याकडे जतात मागणी करतात परंतू बरोबर उत्तर दिले जत नाही. उलट स.सदस्यांवर केसेस होतात. हे बरोबर नाही. याचाही खुलासा होण्याची आवश्यकता आहे. पुंडलिकनगर प्रश्न स.सदस्यांनी अनेक वेळा उपस्थित केला परंतू कार्यवाही होत नाही.

कार्य.अभियंता(पापू) : पुंडलीकनगर भागातील ५० टक्के काम झालेले आहे. २५ ते ३० हजराचे काम आहे.

मा.सभापती :३० हजराचे कामास सहा महिने लागत असतील तर विभाग काय काम करतो हा प्रश्न पडतो. कोणत्या कर्मचाऱ्यांनी काय काम केले पाहिजे किती दिवसात केले पाहिजे हे वरीष्ठ अधिकाऱ्यांनी ठरवून घेतले पाहिजे. जबाबदारी निश्चित केली पाहिजे. जर कुणी कर्मचारी काम करीत नसेल तर हे सभागृह सहन करणार नाही. एकतर अधिकारी यांनी कार्यवाही करावी नसता सभागृहाला तशी माहिती द्यावी सभागृह कार्यवाही करण्याचे आदेशीत करील. ज्या दोन जलवाहिन्या आहेत त्या अनेकदा फुटतात हे समोर आलेले आहे. समांतर जलवाहिनी टाकण्याचे नियोजन का होत नाही.बीओटीवर ती लाईन टाकण्याची कार्यवाही झाली नाही तर महानगरपालिकेमार्फत कार्यवाही होणार नाही का? जनतेला पाणी देणार नाही का हा सर्व खुलासा करावा. किती संस्थेकडे कर्ज उभारणीसाठी मागणी केलेली आहे प्रशासनाचे नियोजन काय आहे हा सर्व खुलासा करावा. जणीवपूर्वक काही ठिकाणचे काम होत नाही असे प्रशासनाचे धोरण आहे का याचाही खुलासा करण्यात यावा.

श्री.मुजीब खान : गेल्या सहा महिण्यात ५ नगरसेवकांवर केसेस झालेल्या आहेत. कामे होत नाही म्हणून नगरसेवक अधिकाऱ्याकडे मागणी करीत असतील. अधिकारी मा.आयुक्तांना वेगळे काही सांगतात आयुक्त आदेश करतात की गुन्हा नोंदवावा. परंतू हे बरोबर नाही. सभागृहात अनेक विषयावर चर्चा होते. त्यात अधिकारी दोषी असतात त्यांचेवर का कार्यवाही होत नाही. ही पध्दत बरोबर नाही. गारखेडा प्रकरणात अधिकारी दोषी आहे कार्यवाही केलेली नाही. ज्यावेळी नगरसेवक काही विकास कामासाठी अधिकारी यांना मोठयाने बोलतात त्यावेळी मा.महापौर सभापती तसेच आयुक्त, उपआयुक्त यांनी एकत्रित बसून त्यांचेशी चर्चा करून हे प्रश्न सुटले पाहिजे. परंतु नगरसेवकांची बाजू घेण्यास कोणी नाही असे दिसून येते. अधिकाऱ्याची बाजू प्रशासन घेते हे उघड दिसते.

मा.सभापती : ६७ कोटीची योजना बारगळली, ज्या दोन जलवाहिन्या आहेत त्या नेहमी फुटतात शहराला पाणी पूरवठा होत नाही. मा.आयुक्त यांनी वेगळी उपाययोजना करण्या संदर्भात काही सुचना केलेल्या आहेत का, याचा खुलासा करावा.

कार्य.अभियंता(पापू) : प्रोजेक्ट मॅनेजमेन्ट कन्सल्टंट नियुक्त करणे किंवा बीओटी पध्दतीने ही योजना करण्यासंदर्भात प्रस्ताव स्थायी समिती समोर आलेला होता. त्यास मान्यता मिळाल्यानंतर त्याप्रमाणे निविदा पण काढलेल्या आहेत. कुठल्याही संस्थेकडे कर्जमागणी करायची असेल तर डिटेल रिपोर्ट असणे आवश्यक आहे. त्यासाठी निविदा मागविल्या होत्या. त्यांचे निविदा आलेल्या आहेत. बीओटी पध्दतीने बुट बेसीस प्रमाणे एक्सपेन्शन ऑफ इन्स्ट्रेस्ट कॉल केलेले होते. त्या अनुषंगाने १८ निविदा विक्री पण झालेल्या आहेत उद्या त्या बाबतीत निर्णय होणार आहे. त्या प्रमाणे त्याचा रिस्पॉन्स बघून बुट बेसीसवर कोणी येणार नाही असे लक्षात आले तर प्रोजेक्ट मॅनेजमेन्ट कन्सल्टंटसाठी ज्या निविदा काढलेल्या आहेत. त्यानुसार कन्सल्टंट नियुक्त करून त्याचा डिटेल रिपोर्ट तयार करावा लागेल. नंतर तो रिपोर्ट कर्जसंस्थेला दाखल करून कर्जघेवून ती लाईन टाकता येईल.

मा.सभापती : सभागृहाने मान्यता देवून तीन महिने झाले उशीर का झालेला आहे. तसेच १९९५ पासून शहरात पाणी टंचाई जणवते असे असतांना प्रशासनाने गेल्या

दहा वर्षात काय नियोजन केलेले होते. सर्व पाणी पुरवठा अधिकारी तसेच प्रशासन यास जबाबदार आहे. नियोजन करण्याची जबाबदारी ही प्रशासनाची आहे. तसेच स.सदस्यांवर केसेस दाखल होतात त्या विषयी प्रशासनाची भुमिका काय आहे.

सौ.लता दलाल : अनेक वेळा जलवाहिनी फुटते आहे. मे महिण्यापासून किती वेळेस अशा घटना झालेल्या आहेत त्यावर खर्च किती तसेच एक्स्प्रेस लाईन ही स्वतंत्र आहे का, किंवा एकाच पाईपद्वारे दोन पाईप आहे याचा खुलासा विचारलेला आहे. नक्षत्रवाडी ते रेल्वेस्टेशन या दरम्यानच सातत्याने ही का फुटते याचाही खुलासा व्हावा. तसेच संमातर जलवाहिनी टाकण्यासाठी प्रशासनाने किती प्रयत्न केलेले आहे केलेले नसतील तर का केलेले नाही. अनेक वेळा जलवाहिनी फुटते तर इतर काय उपाययोजना प्रशासनाने केलेली आहे याचाही खुलासा करावा. वार्डात १० दिवसापासून पाणी नाही नागरीक आम्हाला येवून बोलतात मागणी करतात. वेळीच कार्यवाही झाली नाही तर आम्ही नागरीका सोबत येवू गुन्हे दाखल करून घेणार नाही. याची नोंद घ्यावी.

श्री.गजनन बारवाल : जिन्सी ते नेहरूनगर टाकी दरम्यान पाईप लाईन टाकलेली असून १.१० कोटी खर्च झालेले आहे. १० वर्षापूर्वी काम झालेले असून अद्याप त्या जलवाहिनीद्वारे टाकी भरल्या जत नाही व पाणी दिले जत नाही. याची सुध्दा माहिती देण्यात यावी.

कार्य.अभियंता(पापू) : आठ ते दहा वर्षापूर्वी नेहरूनगर येथे महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाने पाण्याची टाकी भरण्यासाठी जलवाहिनी टाकलेली असून ट्रायलही घेण्यात आले होते पाण्याचे प्रेशर नसल्यामुळे ती तशीच बंद आहे.

श्री.गजनन बारवाल :रूपये १.१० कोटी खर्च होवूनही पाणी दिल्या जत नाही याचे कारण काय टेक्नीकल रिपोर्ट घेतलेला नव्हता का?

मा.आयुक्त : टेक्नीकल माहिती घेवून केलेले नव्हते का? स्लोप दिलेला नव्हता, सर्व खुलासा होणे आवशयक आहे..

कार्य.अभियंता(पापू) : दोन्ही टाक्याची लेव्हल बरोबर नसल्यामुळे प्रेशर येत नाही. या बाबतीत **बुस्टर** लावावे लागेल त्याशिवाय होणार नाही. टेक्नीकल अडचण आहे.

मा.सभापती :१० वर्षापासून नेहरूनगरच्या टाकीमधे जलवाहिनीद्वारे पाणी भरण्याचे काम केले नाही. यावर १.१० कोटीचा खर्चही झालेला आहे तेथील नागरीक दहा वर्षापासून पाणी टंचाईला सामोरे जत असतील नगरसेवकाकडे येवून मागणी करीत असतील. खर्च होवूनही जलवाहिनी द्वारे पाणी दिले जत नसेल तर ही जबाबदारी कोणाची आहे. संबधीतांवर कार्यवाही करणार की नाही याचाही खुलासा करावा.

शहर अभियंता : ही जलवाहिनी टाकलेली आहे परंतू दुध डेअरी पासून जेमास्टर चेंबर आहे तेथून जिन्सी पर्यत ती लाईन गेलेली आहे. हे सर्व कनेक्शन १४०० एमएमच्या लाईनवर आहे. या लाईनवर प्रेशर नसल्यामुळे टाकी भरता येत नाही. प्रेशर कमी आहे. ६७ कोटीची योजना पूर्ण झाली असती तर ६५ एमएलडी जस्त पाणी मिळणार होते या लाईनवरून ती टाकी भरता आली असती.१४०० एमएमच्या लाईनमधून प्रेशर कनेक्ट होत नाही म्हणून टाकी भरली जत नाही.

मा.सभापती : मूळ प्रश्न हा की तेथील जनतेला पाण्याची टंचाई होती म्हणून ती जलवाहिनी टाकण्यात आली.१० वर्षात कार्यान्वित करू शकलो नाही. तेथील जनतेला त्रास झालेला आहे.

शहर अभियंता :आजही इतर ठिकाणाहून नेहरूनगरच्या टाकीत पाणी भरले जते. ज्या प्रमाणे लोकसंख्या वाढेल त्याप्रमाणे इंन्टरनल पाईपलाईन कराव्यात लागणार आहे. ६७ कोटीची योजना झाली नाही म्हणून पाहिजेत्या प्रमाणात जनतेला पाणी मिळत नाही.

मा.आयुक्त : आपण असेच म्हणू शकतो की नवीन जलवाहिनी टाकण्यात येईल तेव्हा या जलवाहिनीचा उपयोग होईल. यात कोणत्याही कारणामुळे प्रेशर वाढलेले नाही. यात झाले असे की पाण्याची कॉन्टेटी वाढवलेली नाही परंतु डिस्ट्रीब्यूशनची लाईन करीत गेलेलो आहे. जे पर्यत समांतर जलवाहिनी होणार नाही तो पर्यत डिस्ट्रीब्यूशनच्या लाईनवर फारच जस्त खर्च करणे उपयोगाचे नाही. शासनाचे सुध्दा निर्देश आहे जेपर्यत प्रशेरची लाईन होत नाही तोपर्यत डिस्ट्रीब्यूशनची करू नये.

सौ.लता दलाल : सदर लाईन ही दहा वर्षापूर्वी केलेली आहे. ६७ कोटीची योजनेला १० वर्षापूर्वी मंजूरी झालेली होती का? १.१० कोटी जेंव्हा खर्च होते. तेव्हा काही तरी नियोजन असेल.

शहर अभियंता : या शहराची लोकसंख्या वाढणार होती. ६७ कोटीचे नियोजन फार दिवसापूर्वी पासून होते. सिडकोसाठी एक्सप्रेस लाईन केलेली आहे त्याचा यावर परीणाम झालेला आहे. सिडकोला सुध्दा १४००, ७०० एमएम च्या लाईनवरून पाणी देण्यात येत होते. आता सिडकोची लोकसंख्या बघता तेथेही अपुरा पाणी पुरवठा होत होता. म्हणून ६७ कोटी योजनेचाच तो एक भाग होतो जेकी सिडकोसाठी एक्सप्रेस पाईपलाईन टाकलेली आहे. ६७ कोटीची योजना पूर्ण झाली असती तर जी २००१ ची मागणी होती ती पूर्ण करू शकलो असतो.

मा.आयुक्त : स.सदस्यांचे मत असे की पाईपलाईन टाकली प्रेशर असणार किंवा काही तरी नियोजन असणार तेंव्हा ती ती टाकली असावी. ६७ कोटीच्या योजनेच्या कार्यवाहीच्या पुर्वी ती टाकलेली आहे.

शहर अभियंता : या बाबतीत माहिती घ्यावी लागेल.

सौ.लता दलाल : जे १.१० कोटीचे जलवाहिनी टाकण्याचे काम झाले. त्या संबधीच्या सर्व संचिका मागवून घ्याव्यात व चौकशी करण्यात यावी.

श्री.मुजेब खान : या संदर्भात माहिती घेतली असता ट्रायल दिवसा घेतले जते परंतू रात्रीच्या वेळी त्या जलवाहिनीला प्रेशर असते असे समजते. रात्रीच्या वेळी ट्रायल घेतल्यास नेहरूनगरची टाकी भरू शकते. जिन्सी भागात एकाही वस्तीत पाण्याची टंचाई नाही. परंतू किराडपूरा, नेहरूनगर, औरंगाबाद टाईम्स कॉलनी, मुजेब कॉलनी, आजम कॉलनी,मकसूद कॉलनी भागात ही टाकी भरल्या जत नसल्यामुळे पाण्याची टंचाई आहे. त्यासाठी रात्री १२ ते ३ वाजेच्या सुमारास ट्रायल घेण्यात यावे जेकी ती टाकी भरू शकतो व नागरीकांना त्याचा फायदा होईल.

मा.सभापती :मूळ प्रश्न हा की शहराला पाणी पुरवठा झाला पाहिजे प्रशासन गांभीर्याने याकडे लक्ष देत नाही असे दिसून येते. पुंडलिकनगरचा प्रश्न उपस्थित झाला २५

हजराचे काम जर सहा महिण्यापासून चालू असेल तर बरोबर नाही. अधिकारी त्यांचे चुका बोलून दाखवित नाही परंतू एखादे नगरसेवक बोलल्यानंतर लगेच मला अमुक बोलले म्हणून प्रशासनाकडे तक्रार होते.

मा.आयुक्त : दोन प्रश्न वेगवेगळे आहेत. जेव्हा पदाधिकारी स.सदस्य खालच्या अधिकाऱ्याकडून काम करून घेतात काम करून घेत असतांना जर ते खालच्या पातळीवर होत नसेल तर माझ्यापर्यंत यावयास पाहिजे कार्यवाही केली जईल परंतू दोन तीन प्रकरणात अधिकाऱ्याबरोबर वागणूक बरोबर झालेली नाही. ती बरोबर असावयास पाहिजे माझ्या पर्यंत जे रिपोर्ट आले होते त्यात शिवीगाळ करण्यात आलेली होती. असा प्रकार होत असेल तर गुन्हा नोंदवावा असेच आदेशीत करू शकतो .

मा.सभापती : स.सदस्यांवर ही वेळ का येते याचा विचार प्रशासन का करीत नाही.

मा.आयुक्त : योग्य वागणूक अधिकाऱ्याना दिली पाहिजे मीही जनतेच्या बाजूने आहे. जनतेची कामे करण्यासाठी मिळूनच कामे करावी लागतात. अधिकाऱ्याना मी पाठीशी घालत नाही. दोन प्रकरणामधे अधिकारी यांना फारच वाईट शब्दात वागणूक दिली. चांगली वागणूक दिली तर चांगले काम होईल व लवकर होईल. पुडंलिकनगर भागातील गल्ली नं. १ ते ११ पर्यंतचे जे काम आहे ते तात्काळ कार्य. अभियंता यांनी करून घ्यावे तसेच जे लोकांनी अनधिकृत नळ कनेक्शन घेतले आहे त्याचेवर कार्यवाही करावी.

कार्य.अभियंता(पापू) : तेथील काम चालू केले होते दरम्यान दोन दिवस बंद होते. आता पून्हा चालू केलेले आहे तेथे काम चालू आहे. तसेच जे अनधिकृत नळकनेक्शन घेतलले आहे ते बंद करण्यात येतील.

श्री.विनायक पांडे : पाण्याचा प्रश्न उपस्थित केल्यानंतरच अनधिकृत कनेक्शन शोधण्याचे काम सुरू होते. गेल्या दहा वर्षात अनधिकृत नळ कनेक्शन शोधण्याची कार्यवाही झालेली नाही. अनेक लोकांनी नळ पट्टी भरलेली आहे परंतू रेर्कांडला नाव नाही . अशी १०० प्रकरणे आपल्या निदर्शनास आणून देवू शकतो. अनधिकृत नळ कनेक्शन शोधायचे असतील संपूर्ण शहरातील शोधावे.

मा.आयुक्त : अनेक ठिकाणी लोकांनी इलिगल नळ कनेक्शन घेतलेले आहे. त्यामुळे पुढील लिगल नळकनेक्शन असलेल्यांना पाणी मिळत नाही म्हणून ही कार्यवाही करावीच लागेल. इलिगल नळ कनेक्शन शोधण्याची कार्यवाही ही पारदर्शक होईल व त्यांचेवर कार्यवाही सुध्दा होईल.

मा.सभापती : जे अधिकारी गेल्या दहा वर्षापासून काम करतात. पाण्याची मोठी टंचाई भासत असतांना नियोजन काहीच केलेले नाही. चार महिन्यापूर्वीच समांतर जलवाहिनी टाकण्यास मंजूरी दिलेली आहे. ३० तारखेला त्यासंबधी खुली चर्चा होणार नंतर कार्यवाही होणार आहे. परंतु तोपर्यत पर्यायी व्यवस्था काय केलेली नाही.

मा.आयुक्त : मी जेव्हा येथे आलो तेंव्हा ६७ कोटीच्या योजनेची कार्यवाही चालू होती त्यातून ६५ एमएलडी पाणी मिळणार होते. या शहराला भविष्यात पाण्याची टंचाई येणार आहे त्यासाठी पाणीसाठा वाढवावा लागेल यात शंका नाही. ६७ कोटीची योजनेत एमजीपी यांनी म्हटले की जस्त प्रेशरने पाणी देवू शकणार नाही. म्हणून ती योजना बंद झाली. जेव्हा प्रशासनाला कळाले तेव्हा विचारणा करण्यात आली की ६५ एमएलडी पाणी पुरवठा करू शकणार की नाही असे त्यांना लिहिले.

त्यानंतर प्रशासनाने कार्यवाही सुरू केली समांतर जलवाहिनी टाकण्यासाठी. त्यासाठी एकूण खर्च हा २०० ते २५० कोटी येणार आहे. पी.एम.सी. नियुक्त करून त्याप्रमाणे योजना राबविण्याची कार्यवाही सुरू केलेली आहे. त्या संदर्भात टेंडर आलेले आहे. परंतू महानगरपालिकेवर मोठया प्रमाणात कर्जचा बोज असल्यामूळे बीओटी पध्दतीने कार्यवाही झाल्यास योग्य होईल असे वाटले. त्या संदर्भात ही टेडर आलेले आहे. उद्या ३० तारखेला त्या संबधी निर्णय होणार आहे. अगोदर बीओटी पध्दतीने समांतर जलवाहिनी टाकण्याची कार्यवाही होत आहे. पीएमसीचे टेंडर उघडलेले नाही. बीओटी पध्दतीने रिस्पॉन्स मिळाला नाही तर पीएमसी नियुक्त करून कार्यवाही होईल. त्यामुळे दोन्ही टेंडर काढलेले आहे. जेवढया लवकर होईल तेवढया लवकर ही योजना कार्यान्वित करण्याचे प्रयत्न आहे. उद्याच्या चर्चेमधे सर्व सदस्यांना बोलविले जईल. दोन महिण्याच्या आत ही कार्यवाही होणार नाही. उद्या चर्चा झाल्यानंतर पून्हा त्यांना ३० दिवसाची मुदत द्यावी लागेल. कारण ३० वर्षापर्यत पाणी देण्याचा करार करणार आहोत मोठी जबाबदारी घेणार आहोत. शासनाची सुध्दा मान्यता लागेल. यामुळे महानगरपालिकेवर कर्जचा बोज होत आहे आणि कोणतेही कर्ज घेतांना शासनाची परवानगी लागते.

सौ.लता दलाल :हिवाळयाचे दिवस होते म्हणून १० दिवस पाणी आले नाही हे लोकांनी सहन केले परंतू उन्हाळयांच्या दिवसात जनता असा त्रास सहन करणार नाही रस्त्यावर येतील. पाणी प्रश्न बाबत गाभीर्य घ्यावे. या योजनेसाठी तात्काळ तरतूद करावी. तातडीने काम करण्यात यावे.

श्री.मुजेब खान :दिल्ली गेट ते नेहरूनगर पर्यत पूर्वी एक जलवाहिनी होती पून्हा मोठी जलवाहिनी टाकण्यात आली.दोन जलवाहिनी असूनही नेहरूनगर येथील टाकी भरल्याजत नाही. तेथील भागातील लोकांना चार चार दिवस पाणी मिळत नाही एवढा त्रास सहन करावा लागतो. या दोन्ही जलवाहिनीवर लोकांनी इनलिगल एक इंच कनेक्शन कमीत कमी १२५ असतील. या संबधी अधिकारी यांना माहिती दिलेली आहे. परंतू अधिकारी सांगतात की त्या लोकांना पाणी कोठून देणार. जे अधिकृत नळ कनेक्शन आहे त्याचे बाबतीत अगोदर विचार केला पाहिजे या लाईनवरील सर्व अनधिकृत नळ कनेक्शन काढले तर नेहरूनगर येथील पाण्याची टाकी भरू शकते. सहा महिने झाले आतापर्यत कार्यवाही झालेली नाही.

श्री.कवरसिंग बैनाडे : शासन २५ कोटी रूपये देवूनही नागरीकांना पाणी मिळत नाही असे नागरीक म्हणतात. शासनाकडून महानगरपालिकेस या वर्षी किती रक्कम विकासासाठी आलेली आहे खुलासा करण्यात यावा. मंत्रीमंडळाची बैठक झाली, दुसऱ्या दिवशी वृत्त्पत्रात आले की २५ कोटी दिले. खरी माहिती देण्यात यावी.

कार्य. अभियंता(पापू) : स.सदस्य श्री. मुजेब खान यांनी केलेल्या प्रश्नाच्या संदर्भात माहिती घेण्यात येईल. सभागृहाला माहिती कळविण्यात येईल.

मा.सभापती : सभागृहात झालेल्या चर्चेनुसार व प्रशासनाने केलेला खुलासा हे लक्षात घेता संमातर जलवाहिनी टाकल्याशिवाय या शहराला पाणी पुरवठा मोठया प्रमाणात करू शकत नाही हे सभागृहाचे मत झालेले होते. त्यानुसार प्रशासनास स्पष्ट सुचनाही दिलेल्या होत्या. या बाबतीची सर्व कार्यवाही प्रशासन करीत आहे व

शासनास जे पत्र व्यवहार करायचा आहे तो त्वरीत करण्याची कार्यवाही व्हावी. इतर फायनन्स कंपनीकडून कर्ज घेवू शकतो का याचीही चौकशी करण्यात यावी. बीओटी पध्दतीने कार्यवाही न झाल्यास महानगरपालिकेच्या वतीने करण्यात यावी. जेणे करून यासाठी बजेट प्रोव्हिजन उपलब्ध करून दिली जईल. हे काम किमान दोन तीन वर्षात होईल दर वर्षी बजेटमधे तरतूद करता येईल. आम्ही सर्व प्रशासनाच्या पाठीशी आहोत. त्वरीत कार्यवाही करण्यात यावी .कमीत कमी कालावधीत ही योजना कशी होईल. यासाठी प्रशासनाने प्रयत्न करावेत. ज्या भागात कमी पाणी पुरवठा होतो त्या संदर्भात पाणीपुरवठा विभागाने एक बैठक घेवून संबधीत वार्डातील नगरसेवकांना सोबत घेवून कर्मचाऱ्यांना तशा सूचना देवून जनतेला पाणी कसे मिळेल यासाठी प्रयत्न करावेत. मुख्य जलवाहिनी फुटल्यानंतर तेथील संपूर्ण कामकाजहे शहर अभियंता यांनी पहावे. जेणे करून कार्यकारी अभियंता पाणीपुरवठा हे शहरातील इतर ठिकाणचा पाणीपुरवठा विस्कळीत होणार नाही याची दखल घेतील.

श्री.शंशाक विसपूते : गारखेडा येथील जलवाहिनीच्या बाबतीत मी मुद्दा उपस्थित केला. सात महिण्यापासून जलवाहिनी टाकण्यात आली. ट्रायल घेतानांत ती फुटते. यात आउटपुट निघालेले नाही. अधिकाऱ्यांना या बाबतीत माहिती दिलेली आहे. तीन तास पाणी वाया जते.

मा.सभापती : गारखेडयासह संपूर्ण शहराचा पाणी पुरवठा कार्यकारी अभियंता यांनी सुरळीत करावा.

मुख्यलेखाधिकारी :पाणीपुरवठा किंवा इतर बाबीसाठी शासनाकडून कोणतेही अनुदाना संबंधीचे आदेश प्राप्त नाहीत.

श्री.कवरसिंग बैनाडे :तसे वृत्तपत्रात द्यावे, जनतेला माहिती होईल.

श्री.रविकांत गवळी :मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमात स्थायी समितीला मोठया प्रमाणात अधिकार आहेत. या समितीने महत्वाचे निर्णय घेतलेले असून गुंठेवारीच्या भागात देखभाल दुरूस्तीची कामे करण्याबाबत ठरावही पास केलेला आहे. त्याची अमलबजवणी होत नाही. अधिकारी सांगतात की मा.आयुक्तांचे तसे लेखी आदेश नाहीत. अधिकारानुसार निर्णय घेवूनही कार्यवाही होत नसेल तर योग्य नाही.

मा.सभापती : स.सदस्य पत्राद्वारे जे अधिकाऱ्याकडे कामाची मागणी करतात. त्याची एक प्रत मा.महापौर, सभापती स्थायी समिती यांचेकडे देण्यात यावी त्याची योग्य ती दखल घेण्यात येईल. स.सदस्यांनी पत्र दिल्यानंतर तीन दिवसात त्यांना प्रशासनाने उत्तर द्यावे अशा सूचना देण्यात येत आहेत.

श्री.रविकांत गवळी : विकास कामे होत नाही म्हणून अधिकारी व स.सदस्य यांच्यात बाचाबाची होते. अशा वेळी दोन अधिकारी दोन पदाधिकारी यांची कमिटी नियुक्त करावी व त्यात असे वाद मिटवावे. नगर सेवक हे विकास कामासाठी मागणी करतात त्यांचेवर गुन्हे दाखल करणे योग्य नाही.

श्री.मुजेब खान : स.सदस्य व अधिकारी यांचेत वाद झाल्यास सत्य परीस्थिती काय आहे यासंबंधी मा.महापौर मा.सभापती यांचे समक्ष चर्चा होवून कोण दोषी आहे याची विचारणा झाली पाहिजे जे दोषी असेल त्याचेवर कार्यवाही झाली पाहीजे केवळ नगरसेवकांवर गुन्हे दाखल करून प्रश्न सुटणार नाही.

सौ.लता दलाल : नगरसेवक तसेच अधिकारी यांचेत वाद झाल्यास दोन्ही बाजू समजवून घ्याव्यात त्यानंतर पुढील कार्यवाही व्हावी.

मा.सभापती : अधिकारी यांनी लोकप्रतिनिधी यांचेशी चांगले वागावे आताच स.सदस्यांनी केलेल्या सुचनांची मा.आयुक्तांनी नोंद घेवून नियमानुसार कार्यवाही केली पाहिजे सत्य परीस्थिती समजवून घेतल्यानंतरच निर्णय घेतले पाहिजे

**विषय क्र. १२२ :**

दिनांक १६-११-२००५ रोजे संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.१४)इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

श्री.मुजेब खान : इतिवृत्तातील पान क्र. ७ वर मोतीवाला हॉलच्या संदर्भात माहिती विचारलेली होती. त्यावर आपण म्हटले की दोन दिवसात माहिती स.सदस्यांना द्यावी परंतू अद्याप पर्यत माहिती दिलेली नाही. किती अतिक्रमण झालेले आहे. नोटीस दिलेली आहे किंवा नाही, तेथील इलिगल नळ काढून टाकण्यात आलेला आहे, किती कर थकलेला आहे याची माहिती देण्यात यावी. नुसते इतिवृत्त कायम केले जते मागिल बैठकीत विचारलेली माहितीचे उत्तर दिले जत नाही. उघडपणे अतिक्रमण केलेल आहे. महानगरपालिकेच्या जगेचे स्वत:च्या नावाने संबधीतानी पी.आर. कार्ड तयार केलेले आहे. कार्यवाही का होत नाही. २० वर्षापासून शादीखाना असून कमर्शियल टॅक्स लागलेला आहे की नाही. मध्यंतरी १ ते २ लक्ष भरण्यात आलेले होते. आणखी किती रक्क्म संबधीताकडे बाकी आहे. याचा खुलासा करण्यात यावा.

श्री.नासेर नहदी : तीन चार बैठकीपूर्वी विचारणा केलेली होती की, महानगरपालिकेच्या खुल्या जगा किती आहेत, सध्या किती जगेवर अतिक्रमण आहे, किती जगा महानगरपालिकेच्या ताब्यात आहेत यांची माहिती अद्याप मला देण्यात आलेली नाही.

मा.आयुक्त : मोतीवाला हॉलच्या संदर्भात उद्या माहिती घेवून कार्यवाही केली जईल.

सहा.संचालक (न.र) : स.सदस्य श्री. नासेर नहदी यांनी जे यादी दिलेली आहे ती तपासून खुल्या जगा किती आहे किती अतिक्रमण झाले आहे याची संपूर्ण माहिती दिली जईल.

श्री.मुजेब खान : स.सदस्य श्री. नासेर नहदी यांनी चार बैठकीपूर्वी ही माहिती विचारलेली होती उत्तर दिलेले नाही. जेवढ्याही मोठया इमारती झालेल्या आहेत त्या रिझर्वेशनच्या जगेवर अतिक्रमण केलेले आहे . किराडपूरा राममंदीर समोर मोठी इमारत असून ओपन स्पेसच्या जगेवर मोठया प्रमाणात अतिक्रमण केलेले असून तेथे दुकाने काढण्यात आली व ती विक्री केलेली आहे. त्या संदर्भात निवेदनही दिलेले आहे. अशा अनेक ठिकाणी जे उद्यान व पार्कीग साठी जगा सोडलेल्या आहेत तेथे अतिक्रमण झालेले आहे. एक एक भागाची माहिती घेवून कार्यवाही केली तर अतिक्रमण राहणार नाही, जगा रिकाम्या होतील.

मा.सभापती : स.सदस्य श्री. नासेर नहदी यांनी जे मागणी केलेली आहे त्यांचा खुलासा उद्या ५.०० वाजेपर्यत सहा.संचालक नगररचना यांनी दयावा.

श्री.नासेर नहदी :बिबीका मकबराचे बाजूला महानगरपालिकेची जगा असून तेथे टपऱ्या व इतर अतिक्रमणे झालेली आहेत.

श्री.विनायक पांडे :पुरातत्व खात्याचे अधिक्षक यांचे अनेक वेळा महानगरपालिकेस पत्र आलेले आहे. ९ मीटर पर्यंतच्या रस्त्यावरील अतिक्रमण काढण्याचे आदेश न्यायालयाचे असून त्यावर स्टे येत असेल तर विधी विभाग काय काम करते.

मा.सभापती : स.सदस्यांनी ज्या सुचना केलेल्या आहेत त्याची उपआयुक्त महसूल यांनी दखल घ्यावी. इतर ठिकाणी अतिक्रमण काढण्याची जी कार्यवाही चालू आहे त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

श्री.रेणुकादास वैद्य : दिनांक ५ ते ७ डिसेंबर या दरम्यान सातारा परीसरात खंडोबा यात्रा असल्यामुळे त्या ठिकाणी या तीन दिवस पाण्याची व्यवस्था तसेच तेथील रस्ते व लाईटची व्यवस्था महानगरपालिकेच्या वतीने करण्यात यावी अशी विनंती आहे.

मा.सभापती : स.सदस्य श्री. वैद्य यांनी जी सुचना केली त्या संदर्भात त्या त्या अधिकाऱ्यांनी नोंद घेवून कार्यवाही करावी. इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

दिनांक १६-११-२००५ रोजे संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

## ऐनवेळचे विषय

**विषय क्र. १२३ :**

आरोग्य वैद्यकीय अधिकारी प्रस्ताव सादर करीत आहेत की, श्री.कमलाकर फड, करमुल्य निर्धारक व संकलक यांच्या मयत पत्नी सिंधुबाई कमलाकर फड यांच्या आजरावर रक्कम रू.८,३४,७५६/- एवढा खर्च झालेला आहे. प्रत्यक्ष अनुज्ञेय असलेली रक्कम रू.७,४८,४०३/- एवढी अनुज्ञेय आहे. अनुज्ञेय रक्कमेच्या ८०% रक्कम रू.५,९८,७२२/- एवढ्या रक्कमेस मनपा वैद्यकीय परतावा विनियम परिपत्रक दिनांक १.१२.१९९४ गंभीर आजर क्र.१८ आगीमुळे भाजणे नुसार प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. करिता अनुज्ञेय रक्कमेच्या ८०% रक्कम रू.५,९८,७२२/- संबंधितास अदा करण्यास प्रस्ताव विचारार्थ व मंजूरीस्तव सादर.

**संवाद :**

मा. सभापती : प्रस्ताव मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्री.कमलाकर फड, करमुल्य निर्धारक व संकलक यांच्या मयत पत्नी सिंधुबाई कमलाकर फड यांच्या आगीमुळे भाजणे या गंभीर आजरावर झालेल्या खर्चापैकी प्रत्यक्ष अनुज्ञेय असलेली रक्कम रू.७,४८,४०३/- च्या ८०% रक्कम रू.५,९८,७२२/- (रक्कम रूपये पाच लक्ष अठ्ठ्याण्णव हजर सातशे बावीस मात्र)संबंधितास अदा करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १२४ :**

उप आयुक्त (महसूल) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, प्रशासकीय विभागामार्फत शहरातील विविध ठिकाणच्या असलेल्या मनपाच्या खुल्या जगा, मंजूर रेखांकनातील खुल्या जगांचे संरक्षण करण्यात येते. सद्य:स्थितीत प्रशासकीय विभागात सहा इमारत निरीक्षक कार्यरत आहेत. शहरात जवळपास ३०० पेक्षा जस्त महापालिकेच्या मालकीच्या खुल्या जगा असून त्यावर होणारी

अतिक्रमणे/अनधिकृत बांधकामे यांवर केवळ सहा इमारत निरीक्षकांकरवी लक्ष ठेवणे कठीण आहे. अशा जगांच्या संरक्षणामध्ये खालील अडचणी येतात.

(०१) खुल्या जगांवर दैनंदिन स्वरूपात देखरेख ठेवणे अशक्य होते.

(०२) एकदा काढलेले अतिक्रमण/अनधिकृत बांधकाम पुन्हा होऊ नये यासाठी त्यावर दैनंदिन नियंत्रण ठेवणे.

(०३) अपुऱ्या कर्मचाऱ्यांमुळे अतिक्रमण हटाव मोहिमा वारंवार रद्द कराव्या लागतात.

(०४) अतिक्रमणे हटवितांना मोठ्या प्रमाणावर विरोध होतो.

उक्त बाबी लक्षात घेता मनपाच्या खल्या जगांचे संरक्षण करण्याच्या दृष्टीकोनातून खालील प्रमाणे प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

१) खुल्या जगांवर होणाऱ्या अतिक्रमणावर/अनधिकृत बांधकामावर नियंत्रण ठेवण्यासाठी तसेच रस्त्यावर होणारी अतिक्रमणे,सार्वजनिक रस्त्यांवर कचरा, घाण, बांधकाम साहित्य टाकणाऱ्या नागरीकांविरूध्द दंडात्मक कारवाई करण्यासाठी खाजगी तत्वावर १२ सुरक्षा रक्षक नेमण्यांत यावेत.

२) महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक मासेम-१०९९/२३९०/प्रक्र-२४४/९९/२८, दिनांक १४ नोव्हेंबर २००२ अन्वये निर्देशित केल्यानुसार शासनमान्य माजी सैनिक मंडळाकडून सुरक्षा रक्षक घेण्यात यावेत.

३) सदर माजी सैनिक प्रथमत: एक वर्षासाठी करार पध्दतीने घेण्यात यावेत.

४) माजी सैनिक महामंडळाकडून कर्मचारी मागवितांना निविदा पध्दतीचा अवलंब करण्याची गरज नसल्याचे उक्त शासन निर्णयात निर्देशित केलेले असल्याने थेट महामंडळाकडून कर्मचारी करार पध्दतीने नेमण्यास मान्यता द्यावी.

५) सदरील कर्मचाऱ्यांच्या मानधनावर महामंडळाच्या अटी शर्तीनुसार येणाऱ्या रू.६६,३०८.५२ तसेच १०.२ टक्के सेंट्रल गव्हर्नमेंट एक्साईज टॅक्स रू.६,७६३.४६ अशा एकूण रू.७३,०७२/- या मासिक खर्चास मान्यता व्हावी. सदरील खर्च वेतन व भत्ते या लेखाशिर्षाखाली प्रशासकीय विभागावर करण्यात येईल.

६) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांच्या सेवा ह्या करार कालावधी पुरत्याच मर्यादित असतील. करार हा थेट महामंडळासमवेत करण्यात येईल. सदर कर्मचऱ्यांना शासकीय सेवेतील इतर कोणतेही लाभ देय नसतील अथवा त्यांना मनपात सामावून घेण्याचा प्रश्न उद्‌भवणार नाही अथवा त्यांना मनपा सेवेत सामावून घेतले जणार नाही.

सदरील प्रस्ताव लेखा विभागाच्या संमतीने सादर करण्यात आलेला आहे. करीता प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**<u>संवाद :</u>**

श्री.रेणुकादास वैद्य : जकात विभागाचे खाजगीकरण होणार आहे तेथील सर्व जवान या कामासाठी घेता येतील. त्यामुळे हा प्रस्ताव नामंजूर करावा.

श्री.कवरसिंग बैनाडे : प्रस्ताव ठेवण्याचे कारण समजले नाही. माजी सैनिकच का घ्यायचे. महानगरपालिकेची आर्थिक स्थिती बिघडवायची का? माजी सैनिक नियुक्त केले तर अतिक्रमण होणार नाही याची गॅरंटी देणार आहेत का? हा ठराव पास करण्याची आवश्यकता नाही रद्द करण्यात यावा.

श्री.मुजेब खान : एकीकडे आपण अतिक्रमण थांबवावे म्हणून चर्चा करतो यास विरोध करणे कितपत योग्य आहे? प्रशासनाचे मत घेण्यात यावे.

मा.सभापती : संबधीत अधिकारी यांनी खुलासा करावा.

उपआयुक्त (महसूल) : अतिक्रमण विभाग अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने व महाराष्ट्र शासनाचे माजी सैनिक कल्याण विभागाचे दिनांक १८ जनेवारी २००२ चे शासन निर्णयानुसार जे माजी सैनिक कल्याण मंडळ स्थापन झालेले आहे त्या मंडळाची नोंदणी ही कंपनी ॲक्ट खाली करण्यात आलेली असून या मंडळाला सुरक्षा रक्षक हे विना निविदा देण्याचे शासनाचे निर्देश आहेत. मनपाच्या ज्या खुल्या जगा आहेत, अतिक्रमण काढतो परंतू पुन्हा अतिक्रमण होवू नये तसे खुल्या जगा आहे त्याचे तात्पूरते किंवा जस्त काळासाठी संरक्षण करावे लागते. या उद्येशाने तसेच औरंगाबाद शहरासाठी ६ इमारत निरीक्षक कार्यरत आहे, ते पूरेसे नाहीत. या सुरक्षा रक्षकांना महामंडळ विशिष्ट प्रकारचा गणवेश देणार आहे. झालेल्या अतिक्रमाणाची माहिती हे ज्ञान देणार आहेत. ठरावात म्हटले आहे की ते महानगरपालिकेचे कर्मचारी असणार नाही. जे करारनामा असेल तो माजी सैनिक महामंडळा बरोबर असेल. किमान एक वर्षासाठी असेल व महानगरपालिकेला जेंव्हा वाटेल तेंव्हा करारनामा रद्द करू शकतो व प्रगती बघून वाढवू शकतो. यास मंजूरी मिळावी.

श्री.कवरसिंग बैनाडे : महानगरपालिकेच्या किमान ३०० खुल्या जगा असतील तर ३०० सुरक्षा रक्षक नियुक्त करणार आहात का? जर सुरक्षा रक्षक नियुक्त करण्याची वेळ येत असेल तर मालमत्ता अधिकारी व संबधीत अधिकारी कशासाठी आहेत. त्यांना कशासाठी सुविधा देण्यात येत आहे.

मा.आयुक्त : सदर सुरक्षा रक्षक हे प्रत्येक महिण्याला माहिती देतील नियमित त्या जगेवर व्हिजीट देतील व कोठे अतिक्रमण चालू आहे हे प्रशासनाला माहिती देतील. त्यात टपरी असेल किंवा अनधिकृत बांधकाम होत असेल तर ती सुध्दा माहिती देतील. तसेच त्यांना गणवेश व इतर सुविधा मंडळाकडून मिळतात. याचा महानगरपालिकेवर बोज पडत नाही. अतिक्रमण होते ही माहिती प्रशासनास मिळते परंतू आपल्याकडे पुरेसा कर्मचारी नसल्यामूळे तात्काळ कार्यवाही होत नाही. तसेच जेथे जेथे अतिक्रमण काढण्याची मोहीम चालू असते तेथे सुध्दा याचा फायदा होईल. तसेच रस्त्यावर जे लोक घाण करतात त्याची नोंद घेतली जत नाही हे ती माहिती सुध्दा घेणार आहे. पहिल्यांदा १२ कर्मचारी घेत आहोत. त्यांचे काम चांगले असेल तर वाढवू शकतो. नसता कमी सुध्दा करू शकतो.

श्री.कवरसिंग बैनाडे : या शहरात अनेक संस्था आहेत ते सुरक्षा रक्षक कर्मचारी कमी वेतनावर देवू शकतात. या कर्मचाऱ्याना महामंडळ पगार देणार नाही महानगरपालिकेला द्यावे लागणार आहे. कमी खर्चात कर्मचारी नियुक्त करता येवू शकतात. जकातीचे खाजगीकरण होत आहे तेथील अनेक कर्मचारी उपलब्ध होतील. त्यांचेकडे हे काम देण्यात यावे.

मा.आयुक्त : जेंव्हा जेंव्हा बदल होतील तेंव्हा त्या प्रमाणे निर्णय घेऊ शकतो.

श्री.मुजेब खान : प्रशासकीय प्रस्ताव आलेला आहे. मंजूर केल्यास काम चांगले होईल असे वाटते. या सभागृहात वारंवार स.सदस्य अतिक्रमणाच्या संबधी चर्चा करतात. त्या संदर्भात तात्काळ कार्यवाही होत नाही. माझ्या वार्डात व आजूबाजूच्या इतर भागात दोन ते अडीच वर्षापासून कोणीही इमारत निरीक्षक आलेले नाही. लोक रस्त्यावर दुकाने वाढवीत आहे. कोणी टपऱ्या टाकण्याचे काम करीत आहे. देखरेख साठी कोणी नाही. तर महानगरपालिकेच्या मोकळया जगेवर मोठे

अतिक्रमण होत आहे. ते थांबविले पाहिजे त्यासाठी हा प्रस्ताव मंजूर करणे योग्य होईल.

श्री.कवरसिंग बैनाडे : दरमहा ७० हजर रूपये खर्च येणार असून भविष्यात सदर कर्मचारी हे युनियममध्ये जतील व आम्हाला कायस्वरूपी सेवेत घ्यावे म्हणून मागणी करतील.

मा.आयुक्त : तशी कार्यवाही करू नये म्हणूनच माजे सैनिक कल्याण महामंडळा मार्फत ही कार्यवाही करीत आहोत. या महामंडळासंबंधी फारच क्लिअर असे शासनाचे गाईड लाईन्स् आहेत. एक व्यक्ती रजेवर गेल्यास दुसरे कर्मचारी मिळणार आहे.

श्री.कवरसिंग बैनाडे : माजे सैनिकांना का नियुक्त करायचे?

मा.आयुक्त : त्यांचे प्रशिक्षण चांगले असते. काम चांगले करू शकतात.

उपआयुक्त(महसूल) : सदर महामंडळ हे शासन निर्णयाप्रमाणे स्थापन झालेले आहे. यात सरळपणे असे आहे की हे सुरक्षा रक्षक विदाऊट टेंडर देण्यात यावे. हे कर्मचारी कोणत्याही संस्थेचे कायमस्वरूपी कर्मचारी म्हणून राहणार नाही. राज्यातील सर्वात मोठी महामंडळे बीएसएनलब औरंगाबाद शहरातील घाटी, तसेच मराठवाडा महसूल प्रशिक्षण प्रबोधिनीब नांदेड वाघाळा महानगरपालिका या सर्व संस्थाकडे हे सुरक्षा रक्षक सध्या कार्यरत आहेत. राज्यातील बऱ्याच जिल्हयात या संस्थेचे काम आहे. संस्थेचे काम अतिशय चांगले आहे. प्रस्तावास मंजूरी देण्यात यावी.

मा.आयुक्त : प्रत्येक वार्ड कार्यालयाचे क्षेत्रासाठी दोन घेत आहोत. महानगरपालिकेकडे कोटयावधीची जवळपास ४५० ओपन स्पेसेस आहेत, रस्ते आहेत. एवढे कर्मचारी लागतीलच.

श्री.रविकांत गवळी : जकात विभागाचे खाजगीकरण होणार आहे तेथील जवान नियुक्त करावे.

श्री.मुजेब खान : जकात मधील कर्मचारी हे काम करू शकत नाही.

श्री.कवरसिंग बैनाडे : अतिक्रमण होणार नाही यांची गॅरंटी घेणार आहे.

मा.आयुक्त : जेमोठया प्रमाणात अतिक्रमण होते त्यास आळा बसेल याची गॅरंटी आहे.

श्री.दिलीप गायकवाड : माझ्या माहिती प्रमाणे अतिक्रमण विभागात प्रभाकर पाठक नावाचे कर्मचारी गेल्या २३ वर्षापासून या विभागात कार्यरत आहे. याचे कारण काय माहिती द्यावी.

श्री.मुजेब खान : अतिक्रमण होणार नाही याची गॅरंटीची मागणी केली आहेत ती देता येईल परंतू त्यासाठी अधिकारी यांना सोयी सुविधा सुध्दा दिल्या पाहिजेत. अनेक वेळा सभागृहात चर्चा होते परंतू कार्यवाही होत नाही. मुंबईत श्री.गो.रा. खैरनार यांनी काटेकोरपणे अतिक्रमण काढण्याची कार्यवाही केली होती. त्याप्रमाणे कार्यवाही होणे अपेक्षीत आहे. ज्या ज्या भागात अतिक्रमण होते ते होवू नये यासाठी सर्व सदस्यांनी सुध्दा प्रयत्न केले पाहिजे प्रशासनाने ठराव ठेवलेला आहे. तो मंजूर करण्यात यावा.

श्री.बारवाल गजनन : कमीत कमी खर्चात काम करून घ्यावे अशी स.सदस्यांची भावना आहे. अनेक माजे सैनिक आहेत. कमी पगारवर काम करू शकतात.

श्री.कवरसिंग बैनाडे : एक स्वतंत्र अधिकारी पद निर्माण करावे. त्यांना सर्व सोयी सवलती देण्यात याव्यात. १५ हाजराच्या वर खर्च येणार नाही.

मा.आयुक्त : या कर्मचाऱ्यांना हेच काम नाही तर इतरही कामे दिली जतील. लोक रस्त्यावर कचरा वगैरे टाकतात,ते टाकू नये यासाठी देखरेख करतील. अधिकारी नियुक्त केल्यास चांगले काम केले नाही तर काय करणार आहे. यात १२ कर्मचारी काम करतील . एकूण १६ कर्मचारी राहतील.

श्री.रविकांत गवळी : या ठरावास माझा पण विरोध आहे. मुंबई सारख्या ठिकाणी एक अधिकारी श्री.खैरनार यांनी अतिक्रमणे काढण्याची कार्यवाही केलेली आहे. या महानगरपालिकेचे अधिकारी तशी कार्यवाही का करू शकत नाही.

श्री.कवरसिंग बैनाडे : विरोध का आहे समजून घ्यावे. खाजगी संस्थेकडून घेण्याची कार्यवाही करावी टेंडर कॉल करावे. महानगरपालिकेचा फायदा होणार आहे. कमी पगारावर कर्मचारी मिळतील. जी संस्था काम घेईल ते गॅरंटी सुध्दा घेईल.

मा.सभापती :महानगरपालिकेच्या मोकळया जगेचे संरक्षण करण्यासाठी व अतिक्रमण रोखण्यासाठी प्रशासनाने सुरक्षा रक्षक नियुक्त करण्या साठी प्रस्ताव ठेवलेला आहे. स.सदस्यांच्या सुचनाची दखल घेवून यात काही त्रूटी आढळयास त्या दूर करण्याची कार्यवाही करावी. बाहेरील कर्मचाऱ्याकडून जस्तीत जस्त काम व कमीत कमी खर्चात कसे करून घेता येईल व पारदर्शकता आणखी कशी ठेवता येईल त्या पध्दतीने काम करून घ्यावे या प्रस्तावात मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहरातील विविध ठिकाणच्या असलेल्या मनपाच्या खुल्या जगा, मंजूर रेखांकनातील खुल्या जगांचे संरक्षण करण्याकरीता तसेच रस्त्यावर होणारी अतिक्रमणे,सार्वजनिक रस्त्यांवर कचरा, घाण, बांधकाम साहित्य टाकणाऱ्या नागरीकांविरूध्द दंडात्मक कारवाई करण्यासाठी खाजगी तत्वावर माजी सैनिक महामंडळाकडून १२ सुरक्षा रक्षक प्रथमत: एक वर्षासाठी करार पध्दतीने घेण्यास प्रस्तावातील १ ते ६ च्या अटी-शर्तीस अधीन राहून मान्यता देण्यात येते. तसेच यासाठी लागणाऱ्या र.रू.७३०७२/-च्या मासिक खर्चास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १२५ :**

अतिरिक्त शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, दि.१८.१०.२००५ रोजी स्थायी समिती सभेमध्ये ठराव क्र.८१ नुसार शहर बस वाहतुकीची निविदा अटी व शर्तीच्या मसुद्यासह मंजूर करण्यात आली आहे. सदरील अटी व शर्तीच्या मसुद्यातील अट क्र.२ मध्ये ८०% कर्ज बँकेकडून घ्यावे लागेल. या कर्जच्या परतफेडीची गॅरन्टी एजन्सीची राहील असा उल्लेख आहे. तथापि कर्जअकोला प्रवासी व माल वाहतुक सहकारी संस्था मर्यादित यांचे नांवे राहणार असून गॅरन्टर म्हणून महानगरपालिका औरंगाबाद ही राहील अशी दुरूस्ती करणे गरजेचे आहे. बसेस महानगरपालिकेच्या नांवे खरेदी करावयाच्या झाल्यास वित्तीय संस्था कर्जदार म्हणून महानगरपालिकेच्या नावे कर्ज देण्यासाठी अट ठेवतात. करिता औरंगाबाद शहरात चालविण्यात येणाऱ्या बसेस अकोला प्रवासी व माल वाहतुक सहकारी संस्था मर्यादित **र्ज अलर्लीिी षि** आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद अशा खरेदी केल्या जतील, अशा प्रकारची दुरूस्ती करारनाम्याच्या मसुद्यातील अट क्र.२ मध्ये करण्याच्या मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दि.१८.१०.२००५ रोजी स्थायी समिती सभेमध्ये ठराव क्र.८१ अन्वये मंजूर करण्यात आलेल्या शहर बस वाहतुकीची निविदेतील अटी व शर्तीच्या मसुद्यातील अट क्र.२ मध्ये '८०% कर्जबँकेकडून घ्यावे लागेल. या कर्जच्या परतफेडीची गॅरन्टी एजन्सीची राहील' या ऐवजी **'कर्जअकोला प्रवासी व माल वाहतुक सहकारी संस्था मर्यादित यांचे नांवे राहणार असून गॅरन्टर**

**म्हणून महानगरपालिका औरंगाबाद ही राहील'** व **'औरंगाबाद शहरात चालविण्यात येणाऱ्या बसेस अकोला प्रवासी व माल वाहतुक सहकारी संस्था मर्यादित On Account of आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद अशा खरेदी केल्या जतील'**, अशा प्रकारची दुरूस्ती करारनाम्याच्या मसुद्यातील अट क्र.२ मध्ये करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**मा.सभापती** : सर्व विभाग प्रमूखाना पुन्हा सुचना करण्यात येते की. स.सदस्यांनी त्यांचे वार्डात एकही कामाचे अंदाजपत्रक तयार नाही किंवा एकाही कामास सुरूवात झालेली नाही म्हणून पत्र दिलेले आहे. यामध्ये मा.आयुक्त यांनी जतीने लक्ष देण्याची गरज आहे. स.सदस्या सौ. पुष्पा शिदे यांचे वार्डात एकही काम सुरू केलेले नाही असे पत्र दिलेले आहे.तरी सर्व विभाग प्रमुख यांना सुचना करण्यात येते की कामाचे अंदाजपत्रक तातडीने तयार करण्याची कार्यवाही करावी. **स.सदस्यांचे सन २००५-०६ च्या अर्थसंकल्पातील लेखाशिर्षक बदलण्याचे प्रस्तावास मंजूरी देण्यात येते**. वार्ड क्र. १,५,८, २६,३५, ३८, ७४ व ८६ चे स.सदस्य श्री.पुनमचंद बमणे, श्री.नोसेर मो.नहदी, श्री.तरविंदरसिंग धिल्लन, श्री.काशीनाथ कोकाटे, श्री. अब्दुल रशीद खान (मामू), श्री.संजु सुग्रीम रिडलॉन, श्री. सलीम पटेल, श्री.बन्सीलाल गांगवे, सौ.वंदना खंदारे या सन्माननीय सदस्यांनी त्यांचे प्रभागातील कामांसाठी लेखाशिर्ष बदलणे बाबत विनंती केल्यानुसार लेखाशिर्षामध्ये बदल करण्यास मान्यता देण्यात येते.

**निर्णय :**

सन २००४-२००५ च्या अर्थसंकल्पात समाविष्ट असलेल्या कामांचे लेखाशिर्षात बदल करणेस्तव प्राप्त प्रस्तावानुसार वार्ड क्र.१,५,८,२६,३५,३८, ५५, ७४ व ८६ या प्रभागातील विविध कामासाठी लेखाशिर्ष बदलणे, आर्थिक तरतुद वळती करण्यास मान्यता देण्यात येते.

| वार्ड क्र. | पृष्ठ क्र. -अ.क्र. | **कामाचे नांव व अर्थसंकल्पातील तरतुद** | **नविन/सुधारीत कामाचे नांव व सुधारीत आर्थिक तरतुद** | **रक्कम** |
|---|---|---|---|---|
| १ | १२ | वॉर्ड क्र.१ हर्सुल फुलेनगर परिसरात डांबरीकरण करणे - **६.००** मधून (१.५० लक्ष ड्रेनेजच्या कामासाठी वळती करणे.) | **१.** वार्ड क्र.१ मधील गायकवाड सोसायटी येथे ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामासाठी अतिरिक्त तरतुद-१.५० लक्ष<br>**२.** वॉर्ड क्र.१ हर्सुल फुलेनगर परिसरात डांबरीकरण करणे | **१.५० लक्ष**<br>**४.५० लक्ष** |
| ५ | १७२/९ | सलीम मौला, मकबरा रोड यांचे घरापासून स्मशानभूमीपर्यंत ड्रेनेज लाईन टाकणे - ३.०० लक्ष | वार्ड क्र.५ अंतर्गत विविध ठिकाणी ड्रेनेजलाईन टाकणे | **३.०० लक्ष** |
| | १८८/६ | आसाराम बापु आश्रम रोडवरील पथदिवे बसविणे - १.०० लक्ष | वार्ड क्र.५ मध्ये विविध ठिकाणी पथदिवे बसविणे | **१.०० लक्ष** |
| ८ | १६७/ १२७ | वॉर्ड क्र.८ मधील मिटमिटा व पडेगांव मध्ये पाण्याची मोठी टाकी बांधणे-५.०० लक्ष | वॉर्ड क्र.८ मध्ये विविध ठिकाणी हातपंप (बोरींग)बसविणे | **५.०० लक्ष** |
| | ११६/४ | लेखाशीर्ष-अठरा खेडी विकास कार्यक्रम<br>पडेगांव येथे रस्त्याचे पुनर्डांबरीकरण करणे - ४.७२ लक्ष | लेखाशीर्ष-भांडवली कामे पाणी पुरवठा<br>वॉर्ड क्र.८ मध्ये विविध ठिकाणी जलवाहिनी टाकणे | **४.७२ लक्ष** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | ११६/३ | **<u>लेखाशीर्ष-अठरा खेडी विकास कार्यक्रम</u>** मिटमिटा येथे रस्त्याचे पुनर्डांबरीकरण करणे - ४.८४ लक्ष | **<u>लेखाशीर्ष-नवीन पथदिवे व्यवस्था</u>** वॉर्ड क्र.८ मध्ये विविध ठिकाणी विद्युतीकरणाची कामे करणे | **४.८४ लक्ष** |
| २६ | १७८/१३ | **<u>भांडवली कामे जलनि:सारण</u>** वॉर्ड २६ नवीन ड्रेनेजलाईन टाकणे, जुन्या ड्रेनेजलाईनची दुरूस्ती करणे व सेप्टीक टँक बंद करणे - १० लक्ष (मधून र.रू.१.०० लक्ष वळती करणे) | १) वॉर्ड २६ नवीन ड्रेनेज लाईन टाकणे, जुन्या ड्रेनेज लाईनची दुरूस्ती करणे व सेप्टीक टँक बंद करणे<br>२) वॉर्ड क्र.२६ मध्ये विद्युत देखभाल दुरूस्तीची कामे करणे | **९.०० लक्ष**<br><br>**१.०० लक्ष** |
| ३५ | १८७/३<br>१८७/१० | १)गरमपाणी येथील नाल्यावर संरक्षीत भिंत बांधणे- ८.०० लक्ष<br>२) मोगलपुरा नाल्यास संरक्षित भिंत बांधणे - ७.०० लक्ष(काम रद्द करून) | (अ.क्र.१ व २ ची एकत्रित तरतुद) गरमपाणी येथील नाल्यावर संरक्षित भिंत बांधणे | **१५.०० लक्ष** |
| ३८ | १४०/२१ | अंगुरीबाग येथील अंतर्गत रस्ते पुनर्डांबरीकरण करणे - २.५२ लक्ष | बंजरा कॉलनी महाराणा प्रताप शाळेतील गल्लीमध्यें डांबरीकरण करणे | **२.५२ लक्ष** |
| ५५ | १८६/२४ | **<u>लेखाशीर्ष-शहरी भागात खुल्या गटारी बांधणे</u>** प्रभाग क्र.५५ ग.क्र.३ ते ग.क्र.४ हब्बुभाई यांच्या घरापासून चंपाचौकपर्यंत गटार बांधणे -६ लक्ष **मधून झालेली बचत-रू.३.००** लक्ष-कॉंक्रेटींगसाठी वळती करणे | **<u>लेखाशीर्ष-नवीन कॉंक्रीट रस्ते</u>** पृष्ठ क्र.१४७ अ.क्र.४७ - प्रभाग क्र.५५ कैसर कॉलनी येथे विविध ठिकाणी कॉंक्रेटींग करणे - **३.००** + गटारीचे कामातून झालेली बचत **३.००** लक्ष वळती करणे.(**एकूण ६ लक्ष**) | **६.०० लक्ष** |
| ७४ | १४७/५४ | १) संजयनगरमधील ग.नं.९ ते १२ मधील छोट्या गल्लीत फरशी बसविणे - २.०० लक्ष<br>२) रोहीदासनगर गल्ली नं.१ व २ मधील लहान गल्लीत फरशी बसविणे - २.०० लक्ष | (क्र.१ व २ ची कामे रद्द करून त्यासाठीची एकत्रित र.रू.४.०० लक्ष पान क्र.१८६ अ.क्र.२९वरील कामासाठी वळती करणे) संजयनगरच्या संरक्षण भिंतीपासून विमानतळापर्यंत संजयनगरचे सांडपाणी काढण्यासाठील मोठा नाला भूमिगत गटार बांधणे.(**६ लक्ष+४ लक्ष=१० लक्ष)** | **१०.०० लक्ष** |
| ८६ | १४५/४० | बजरंग नगर येथे खडीकरण करणे - २.०० लक्ष | वॉर्ड क्र.८६ मध्ये नवीन विद्युत पोल लावणे | **२.०० लक्ष** |

''राष्टगितानंतर ''सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद